# Paradise Lost - मानवाने स्वर्ग गमावला

कवी: जॉन मिल्टन
संक्षिप्त मराठी कथानक: प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविक:**

इलियड आणि ओडेसी या ग्रीक महाकाव्यांनंतर शेकडो वर्षे लोटली पण दखलपात्र असे महाकाव्य निर्माण व्हायला मिल्टनला जन्म घ्यावा लागला. मिल्टनचे हे महाकाव्य इंग्लिशमधले एकमेव अनुपमेय महाकाव्य आहे. विश्वाला कवेत घेणारे कथानक, परमेश्वर, सैतान, आदिमानव ऍडॅम आणि ईव्ह, देवदूत अशी वैश्विक (supernatural) त्यातली प्रमुख पात्रे आहेत. स्वर्ग, नंदनवन (garden of Eden), पृथ्वी, नरक या सर्व ठिकाणी संचार करणारे कथाविश्व आणि या असामान्य रचनाविश्वाला दाद देणारी असामान्य काव्यशैली या सर्व अमानवी वैशिष्ट्यांमुळे Paradise Lost हे 'न भूतो न भविष्यति' असे अलौकिक महाकाव्य झाले आहे. बायबलमध्ये 'Genesis' (निर्मिती) या प्रकरणात ही कथा येते. या तुटपुंज्या सामग्रीवर मिल्टनने आपल्या अलौकिक प्रतिभेच्या (inspiration) सहाय्याने हे महाविश्व उभे केले आहे. या विश्वाला वैज्ञानिक सत्याचा, वास्तवाचा कुठेही आधार नाही. आपल्या विलक्षण कल्पनासामर्थ्याची आणि अभूतपूर्व भाषाप्रभुत्वाची परमावधी मिल्टनने इथे गाठली आहे.

मिल्टनच्या जीवनाचा (१६०९-१६७४) फार मोठा प्रभाव या साहित्यकृतीवर पडलेला आहे. केंब्रिज विद्यापीठाचा त्यावेळचा एम.ए., प्रगाढ विद्वत्ता, ग्रीक, लॅटिन वाङमयाचा गाढा पंडित असलेला मिल्टन १६४५ मध्ये राजकारणाकडे ओढला गेला. रोमन कॅथॉलिक पंथाचा राजा पहिला चार्ल्स व प्रॉटेस्टंट पंथाचे पार्लमेंट यांच्या दीर्घ संघर्षात मिल्टन पार्लमेंटच्या बाजूने उतरला. तीव्र संघर्षाची परिणती यादवी युद्धात (civil war) मध्ये झाली. पार्लमेंटच्या सैन्याने राजाच्या सैन्याचा पराभव केला, राजाला पकडले व त्याला राजद्रोहाच्या आरोपावरून सुळावर चढवले. १६५२ ते १६५८ हा इंग्लंडच्या इतिहासातील एकमेव प्रजासत्ताकाचा काळ. या प्रजासत्ताकामध्ये मिल्टन हा प्रमुख मंत्री होता. १६५२ मध्ये त्याने 'राजाच्या वधाचे केलेले समर्थन' खूप गाजले. १६५८ मध्ये प्रजासत्ताकाचा अध्यक्ष ऑलिव्हर क्रॉमवेलचे निधन झाले आणि आपण आपल्या देवतुल्य (Divine Right of King) राजाला सुळी दिले या अपराधाने पश्चात्तापात पोळणारी इंग्लंडची रूढीप्रिय जनता फ्रान्समध्ये पळून गेलेल्या राजाच्या मुलाला दुसऱ्या चार्ल्सला सन्मानपूर्वक परत बोलावती झाली. १६६० मध्ये परत राजसत्ता सुरू झाली. ही घटना इंग्लंडच्या इतिहासात 'राजसत्तेचे पुनरागमन (Restoration of Monarchy)' म्हणून प्रसिद्ध आहे. दुसऱ्या चार्ल्सने आपल्या वडिलांच्या वधाला कारणीभूत झालेल्या सर्वांचा सूड घेणे सुरू केले. लोकसत्ताकाचे अनेक पुढारी सुळावर चढवले गेले; मिल्टनची तीच गत झाली असती, पण त्याच्या कवित्वामुळे, अंधत्वामुळे, व मित्रांच्या रदबदलीमुळे त्याचे प्राण वाचले. पण राजाने त्याची सर्व मालमत्ता जप्त केली. निष्कांचन झालेला आंधळा मिल्टन पूर्णतः हताश, हतबल झाला. १६५२ मध्ये सुरू झालेल्या डोळ्यांच्या दुखण्याचे दोनच वर्षात आंधळेपणात पर्यवसान झाले. निष्कांचन, आंधळा, परावलंबी मिल्टन मनाने अजूनही खंबीर, स्वाभिमानी होता. पण शरीराने आणि परिस्थितीने त्याला पूर्णतः हतबल केले. मानी मनाच्या

मिल्टनने १६६३ साली आपल्या आयुष्यातील सर्वश्रेष्ठ साहित्यकृती - Paradise Lost - लिहावयास सुरूवात केली. लिहिण्याचे काम करणाऱ्या त्याच्या दोन मुलींनी त्याला खूप छळले. १६७० मध्ये त्याची ही साहित्यकृती तयार झाली. 'Better to rule in Hell than to serve in Heaven' असे म्हणणारा ल्युसिफर (सैतान) मिल्टनच्या भावनेचे प्रतिबिंब आहे.

**प्रमुख पात्रे**:

| | |
|---|---|
| परमेश्वरः | सर्वज्ञ, सर्वशक्तिमान विश्वाधीश. |
| ल्युसिफरः | परमेश्वराचा प्रमुख अधिकारी [Archangel]. उजवा हात (उपाध्यक्ष), परमेश्वराविरुद्ध बंड केल्यामुळे त्याला स्वर्गातून हाकलून दिले जाते; पाताळातून तो परमेश्वराविरूद्ध कारवाया करत राहतो; महाकाव्याचा खलनायक, सैतान. |
| मायकेल, रॅफेल, ॲबडियल, गॅब्रियल, यूरियल ... | परमेश्वराचे प्रमुख अधिकारी (archangels). |
| बील्झेबब, मोलोक, बेलियल, मॅमन, मल्सिबर ... | लुसिफरचे सहकारी, प्रमुख बंडखोर देवदूत, ल्युसिफरबरोबर पाताळात ढकललेले. |
| ॲडमः | आदिमानव, परमेश्वराने निर्माण केलेला पहिला मनुष्य. नंदनवनाचा पहिला रहिवासी |
| ईव्हः | आदिमाता, पहिली स्त्री, ॲडमची सहचरी, पत्नी. |
| मृत्यु, पापः | सैतानाची मुले, पाताळाचे [Hell] चे पहारेकरी. |

**कथानक**:

स्वर्गामध्ये परमेश्वराचा उजवा हात, उपाध्यक्ष म्हणून काम करणारा देवदूत ल्युसिफर महत्वाकांक्षी असतो. परमेश्वराचे सर्व काम आपणच करतो मग आपणच परमेश्वर का होऊ नये या महत्वाकांक्षेने प्रेरित झालेला ल्युसिफर इतर अनेक देवदूतांना आपल्याकडे वळवून घेतो व परमेश्वराविरुद्ध बंड करतो. स्वर्गामध्ये परमेश्वराचे पाठिराखे व बंडखोर देवदूत यांच्यामध्ये यादवी युद्ध होते. परमेश्वराचा पुत्र मेसिआ ल्युसिफरचा पराभव करतो. ल्युसिफर व त्याचे सहकारी बंडखोर देवदूतांना स्वर्गातून खाली ढकलले जाते. ते विश्वाच्या पोकळीतून [Chaos] खाली खाली ९ दिवस पडत राहतात व अखेरीस पाताळातील सतत जळत असणाऱ्या गंधकाच्या [sulphur] नदीच्या पृष्ठभागावर येऊन पडतात. अंधार, आग, व असह्य यातना यातून ते हळुहळू सावरतात. मल्सिबर त्यांच्यासाठी एक प्रचंड राजवाडा [Pandemonium] तेथे उभारतो. बंडखोर नेते पुढील योजना ठरवू लागतात. ल्युसिफरची कल्पना सर्वांना मान्य होते. त्यानुसार, ’पृथ्वीवर नंदनवनामध्ये परमेश्वराने निर्माण केलेल्या देवदूतांचा नायक, पहिला मानव ॲडम याला आपल्याकडे वळवून

घ्यायचा व परमेश्वराचा असा सूड घ्यायचा' असे ठरते. त्या दृष्टीने पूर्वतयारी करण्यासाठी ल्युसिफर नंदनवनाकडे निघतो.

दरम्यान परमेश्वराने स्वर्गात पहिला मानव ऍडॅम व त्याला सोबत म्हणून ईव्ह या पहिल्या स्त्रीला निर्माण केलेले असते व ते दोघेही बागेत जोडीने आनंदात स्वैर विहार करत असतात. त्यांना सर्व गोष्टींचे स्वातंत्र्य असते; फक्त बागेत एका कोपऱ्यात असलेल्या एका सफरचंदाच्या झाडाच्या सोनेरी फळाला स्पर्श करण्याची मनाई असते.

ल्युसिफर (त्याचे नाव आता 'दुष्टबुद्धीचा देवदूत' म्हणून 'सैतान' झालेले असते) ऍडॅमला फसवायला येत आहे ही बातमी देवाला अंत:ज्ञानाने कळते व तो रॅफेल नावाच्या देवदुताला ऍडॅमला सावध करण्यासाठी पाठवतो. सोनेरी सफरचंदाला हात न लावण्याची कठोर सूचना रॅफेल परत ऍडॅमला बजावून देतो, ईव्हला एकटी न सोडण्याची खबरदारी घ्यायला सांगतो. ऍडॅमच्या जिज्ञासेतून निर्माण झालेल्या प्रश्नाचे उत्तर देताना रॅफेल त्याला पूर्वीच्या सर्व घटना - ल्युसिफरचे बंड, यादवी युद्धात त्याचा झालेला पराभव व परमेश्वराचा सूड घेण्याची सैतानाची योजना - सर्व त्याला सांगतो. सैतानापासून बागेचे रक्षण करण्यासाठी रॅफेल दोन रक्षकांची खास नेमणूक करून स्वर्गात परत जातो.

दुर्दैवाने हे रक्षक येण्यापूर्वीच सैतान बागेत येऊन पोचलेला असतो. तो ईव्हच्या स्वप्नामध्ये तिच्या मनात सोनेरी सफरचंदाबद्दल आकर्षण निर्माण करतो. एका मृत सापाच्या देहात प्रवेश करून तो ईव्हच्या भेटीची गवतात दडून वाट पहात थांबतो.

दोन दिवस जातात आणि तो दुर्दैवी काळदिवस उजाडतो. रोजच्या बागेतून फिरण्याच्या वेळी ईव्ह वेगळे वेगळे फिरायला जाण्याचा हट्ट धरते व एकटीच बागेत फिरत राहते. या क्षणाची वाट पहात असलेला सैतान तिला अगदी मधुर आवाजात संबोधतो, 'हे सुंदरी, तू कोण आहेस, कुठे चालली आहेस?' एक साप मनुष्यासारखा गोड आवाजात बोलताना पाहून ईव्हचे स्त्रीसुलभ कुतुहल जागे होते. तिच्या प्रश्नाला उत्तर देताना सैतान म्हणतो, 'त्या सोनेरी सफरचंदाला मी नुसता स्पर्श केला तर मला ही किमया प्राप्त झाली. तू जर त्याचा आस्वाद घेतलास तर तू त्रैलोक्यसुंदरी होशील व साऱ्या विश्वाची सम्राज्ञी होशील.' 'स्तुतीला भाळणारी' हा स्त्रीचा लौकिक ईव्हपासूनच सुरू झाला. पहिल्या स्त्रीचा तो पहिला प्रमाद साऱ्या मानवजातीला ग्रासून गेला.

ईव्ह ऍडॅमची धोक्याची सूचना पूर्णपणे विसरते व धावत धावत जाऊन ते सोनेरी फळ तोडते व त्याचा घास घेते. तिच्या त्या आज्ञाभंगाच्या पापाचा धक्का एखाद्या भूकंपासारखा साऱ्या नंदनवनाला जाणवतो. धास्तावलेला ऍडॅम धावत धावत तेथे येतो. ईव्हच्या हातातील अर्धवट खाल्लेले फळ पाहताच तो सर्व प्रकार समजतो, कपाळाला हात लावतो. तिच्या हातातील फळ घेऊन 'तुझ्या प्रेमाखातर मीही हे पाप करीत आहे' [together in love and sin] असे म्हणून तोही त्या सफरचंदाचा आस्वाद घेतो. सफरचंदाचे ते झाड ज्ञानाचे झाड [Tree of Knowledge] असते.

आतापर्यंत अज्ञानात सुखी असलेले ते दोन जीव स्वतःच्या स्त्री पुरूषत्वाची जाणीव होताच वासनाग्रस्त होतात आणि भावी मानवजातीच्या उत्पत्तीचा पाया घातला जातो.

आपले काम फत्ते होताच सैतान नरकामध्ये परत जातो. आता त्याचे व त्याच्या सर्व सहकाऱ्यांचे रूपांतर सापात होते. सैतान आपल्या दोन्ही मुलांना - पाप आणि मृत्यु - पृथ्वीवर मानवजातीला आपले प्रतिनिधी म्हणून पाठवतो.

आज्ञाभंगाच्या पातकाची शिक्षा म्हणून परमेश्वर ॲडम व ईव्ह यांना नंदनवनातून हद्दपार करतो. प्रमुख देवदूत मायकेल त्या दोघांना निरोप देतो. तो त्यांना त्यांच्या व त्यांच्या वंशजांच्या भविष्याचे चित्र दाखवतो ते मोठे भयानक असते. हिंसा, दंगे, मारामाऱ्या, रोगराई, पूर, भूकंप, आणि मृत्यू आणि सर्व प्रकारच्या वेदनांना, दुःखाना तोंड देऊन गांजलेली मानवजात अखेरीस जलबुडीच्या महापुरात [The Great Flood] जवळ जवळ नष्ट होते; काही भाग्यवान जीव नोआच्या बोटीचा [Noah's arc] आधार घेऊन वाचतात. पृथ्वीवर परत मानवजात वाढीस लागते पण तिचे शापित नष्टचर्य परत सुरू होते. त्यांना वाचवायला आलेला परमेश्वराचा पुत्र येशू [Jesus] यालाच ते सुळावर चढवतात. पण त्याने मानवजातीसाठी केलेल्या या प्राणार्पणामुळे त्याचे एकनिष्ठ अनुयायी ख्रिश्चन या दुःखद जीवनातून मुक्त होतात.

असा हा मानवजातीचा आशावादी शेवट असलेला भविष्यकाळ पाहून ॲडम आत्महत्येचा विचार सोडून देतो. ॲडम आणि ईव्ह एकमेकांचा हात धरून खिन्न मनाने नंदनवनाचा कायमचा निरोप घेतात [They, hand in hand, with wandering steps and slow, Through Garden took their solitary way] या वाक्यातील खिन्नता हृदयस्पर्शी आहे.

मानवाच्या स्वर्ग गमावण्याच्या या शोकांतिकेचे छोटेसे बीज बायबलच्या कथेत मिळते पण आपल्या अलौकिक प्रतिभासामर्थ्याने मिल्टनने त्यावर महाकाव्याचा भव्य वटवृक्ष उभारला आहे. त्यातील विश्वाचा पसारा, अमानवी व्यक्तिचित्रे व घटना हा सर्व मिल्टनच्या कल्पनाशक्तीचा खेळ आहे. हे सर्व शब्दबद्ध करणारी त्याची उदात्त काव्यशैली इंग्लिश वाङमयात परत कधीही, कोणत्याही कवीला जमली नाही. मिल्टनने स्वतःच केलेल्या श्रेष्ठ ग्रंथाची व्याख्या 'A great book is the precious life-blood of a master spirit' या महाकाव्याला तंतोतंत लागू पडते. आपल्या वैयक्तिक दुःखातून निर्माण केलेले हे महाशिल्प हा मिल्टनकडून इंग्लिश वाङमयाला मिळालेला असामान्य, अनुपमेय, अमोल, अद्‌वितीय नजराणा आहे.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 25881194
Email: joshi.bindumadhav@gmail.com